( **सभापतीस्थानी माननीय सभापती** )

**पृ.शी. व मु.शी.** सदस्यांचा परिचय व शपथविधी

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री ): सभापती महोदय, कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातर्फे निर्वाचित सदस्य श्री.रामनाथदादा मोते यांचा आपणास व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. रामनाथदादा मोते यांनी शपथ घेतली.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, भंडारा - गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातर्फे निर्वाचित सदस्य श्री.राजेंद्र हिरालाल जैन यांचा आपणास व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री.राजेंद्र हिरालाल जैन यांनी शपथ घेतली.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, औरंगाबाद विभाग शिक्षक मतदारसंघातर्फे निर्वाचित सदस्य श्री.विक्रम वसंतराव काळे यांचा आपणास व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. विक्रम वसंतराव काळे यांनी शपथ घेतली

श्री.अजित पवार : सभापती महोदय, नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघातर्फे निर्वाचित सदस्य डॉ.सुधीर भास्करराव तांबे यांचा आपणास व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

डॉ.सुधीर भास्करराव तांबे यांनी शपथ घेतली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.सरफरे

श्री. अजित पवार : सभापती महोदय, पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातर्फे निर्वाचित सदस्य श्री. अनिल शिवाजीराव भोसले यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. अनिल शिवाजीराव भोसले यांनी शपथ घेतली.

----

श्री. अजित पवार : सभापती महोदय, नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातर्फे निर्वाचित सदस्य श्री. नागो पुंडलिक गाणार यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. नागो पुंडलिक गाणार यांनी शपथ घेतली.

-----

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सातारा-सांगली स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातर्फे निर्वाचित सदस्य श्री. प्रभाकर देवबा घार्गे यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. प्रभाकर देवबा घार्गे यांनी शपथ घेतली.

----

श्री. अजित पवार : सभापती महोदय, नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातर्फे निर्वाचित सदस्य श्री. अमरनाथ अनंतराव राजूरकर यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. अमरनाथ अनंतराव राजूरकर यांनी शपथ घेतली.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KGS/KTG पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:10

श्री.अजित पवार : सभापती महोदय, अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातर्फे निर्वाचित सदस्य डॉ.रणजित विठ्ठलराव पाटील यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

डॉ.रणजित विठ्ठलराव पाटील यांनी शपथ घेतली.

-----

.. . .सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

**सभापती** : माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या तीन सूचना देण्यात आलेल्या आहेत. पहिली सूचना सकाळी 08 वाजून 44 मिनिटांनी, सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री.संजय केळकर, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.परशुराम उपरकर यांनी दिलेली आहे.

दुसरी प्रस्तावाची सूचना सकाळी 08 वाजून 45 मिनिटांनी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेली आहे.

तिसरी प्रस्तावाची सूचना सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी दिलेली आहे.

या तीनही प्रस्तावांमधील आशय जवळजवळ एकसारखाच आहे आणि त्यामध्ये "आदर्श" सोसायटीच्या अनुषंगाने मुद्दा उपस्थित करुन, आजचे सभागृहासमोरील सर्व कामकाज तहकूब करुन सन्माननीय सदस्यांनी चर्चेची मागणी केलेली आहे. या अनुषंगाने मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना दोन-तीन मिनिटामध्ये त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी परवानगी देत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही एक आगळी-वेगळी सूचना आहे. आतापर्यंत या सदनामध्ये नियम 289 अन्वये विविध विषयांवर सूचना देण्यात आलेल्या आहेत.गेल्या 5-7 वर्षामध्ये या महाराष्ट्रात भूखंडाच्या प्रकरणांची एक प्रचंड श्रृंखला निर्माण झालेली आहे आणि त्याचे हिमनगावरील टोक म्हणजे हा आदर्श घोटाळा आहे.याचे नाव "आदर्श" आहे म्हणजे घोटाळा सुध्दा आदर्श असू शकतो हे यामधून दाखवून दिलेले आहे.कारगील युध्दामध्ये शहीद झालेल्या कुटुंबियांच्या वारसांसाठी घरे बांधण्याकरता नेव्हीच्या भूखंडावर ही जागा राखीव ठेवण्यात आली होती. परंतु तेथे एका सोसायटीचे रजिस्ट्रेशन करण्यात आले. खरे म्हणजे सदर जमिनीवर सी.आर.झेड.चे उल्लंघन करण्यात आले आहे.तसेच पर्यावरण विभागाची देखील परवानगी घेतलेली नाही. 1999 मध्ये सुरु झालेले हे प्रकरण 2010 मध्ये उघडकीस आले आहे आणि 6 मजल्यांची इमारत 31 मजल्यापर्यंत बांधण्यात आली आहे आणि त्यामध्ये राज्यकर्त्यांपासून प्रशासनानेही आपले हात धुवून घेतले आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, या प्रकरणाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागलेला आहे.सर्व देशामध्ये महाराष्ट्राची नाचक्की झालेली आहे. ही बिल्डिंग 31 मजल्यापर्यंत कशी वाढविण्यात आली? या बिल्डिंगच्या संदर्भातील फाईल प्रत्येक टेबलवर जात असताना या बिल्डिंगचा एक-एक मजला वाढत गेला. या प्रकरणाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला पण ज्यांनी ज्यांनी शिफारशी केल्या त्यामध्ये काही मंत्र्यांचाही समावेश आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सुध्दा या बिल्डिंगमध्ये फ्लॅट लाटलेले आहेत. त्यामुळे छत्रपतींच्या महाराष्ट्राची सर्व देशभर नाचक्की झालेली आहे म्हणून हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. या प्रकरणाची चौकशी होणे गरजेचे आहे. या प्रकरणाची चौकशी व्हावी, यासाठी सभागृहाचे इतर सर्व कामकाज तहकूब करुन नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे अशी आमची आग्रहाची मागणी आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहासमोरील इतर सर्व कामकाज बाजूला ठेवून या प्रकरणावर चर्चा व्हावी, अशा प्रकारची अभूतपूर्व परिस्थिती या प्रकरणाच्या निमित्ताने महाराष्ट्रात निर्माण झालेली आहे. प्रशासकीय अधिकारी एखादी गोष्ट कशा प्रकारे बेकायदेशीर करु शकतात हे संपूर्ण देशाला दाखविण्याचा विक्रम महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केलेला आहे.आणि असे करीत असताना शासनामध्ये असलेल्या, सरकार चालविणाऱ्यांना कसे गुंतवायचे याचे एक उत्कृष्ट उदाहरण निर्माण केलेले आहे. सरकार मधील मंत्र्यांनी आणि अधिकाऱ्यांनी हातातहात घातल्यानंतर काय घडू शकते हे आपल्याला यावरुन दिसून येते. आणि हे कमी झाले की काय म्हणून या देशाचे रक्षण करणाऱ्या सैन्याच्या प्रतिष्ठित अधिकाऱ्यांना सुध्दा यामध्ये गुंतविण्याचा प्रयत्न झालेला आहे. केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने यासबंधीची दखल घेतलेली आहे. अशा पकारे एकंदरित विपरीत परिस्थिती निर्माण करणारी ही घटना आहे.या प्रकरणामधील अनेक बाबींचा खुलासा होणे बाकी आहे. हा भूखंड कोणाचा आहे, या भूखंडावर कोणाची मालकी आहे हे सांगितले पाहिजे. सभापती महोदय, संपूर्ण देशाचे लक्ष या विधिमंडळाकडे लागलेले आहे. या प्रकरणाचे नक्की काय होणार आहे, कोणाला शिक्षा होणार आहे? माननीय मुख्यमंत्र्यांनी राजीनामा देणे पुरेसे नाही म्हणून तातडीने या विषयाच्या संदर्भातील चर्चा झाली पाहिजे आणि शासनाची भूमिका स्पष्टपणे लोकांपुढे गेली पाहिजे, याकरिता या सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/

श्री. दिवाकर रावते.....

ठेवून या विषयावर चर्चा करण्यात यावी अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रातील विधिमंडळतील सर्व सन्माननीय सदस्य अत्यंत बदनाम झाले असल्यामुळे यासंदर्भात तातडीने चर्चा करणे आवश्यक आहे म्हणून सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, ताबडतोब सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा करण्याकरिता शासनाने हिरवा कंदील दाखववावा आणि चर्चेला सुरुवात करावी. धन्यवाद.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो शर्ट परिधान केलेला आहे तो या सभागृहाच्या एकंदर डेकोरमच्या दृष्टीने योग्य नसल्यामुळे काढणे गरजेचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 'आदर्श' असा शब्द गेली हजारे वर्षे वापरण्यात येत आहे. माननीय सभापती आदर्श आहेत असे आम्ही म्हणू शकतो. माझे सगळे सहकारी आदर्श आहेत असे आम्ही म्हणू शकतो.

**सभापती** : जरी ते काहीही असले तरी कृपया आपण परिधान केलेला शर्ट काढावा असे माझ्ो निदेश आहेत.

( काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत असतात )

**सभापती** : सभापतींनी दिलेले निदेश सन्माननीय सदस्यांनी माणने गरजेचे आहे. कृपया सन्माननीय सदस्यांनी परिधान केलेला शर्ट काढावा.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, 'आदर्श' या शब्दामध्ये काय वाईट आहे हे आपण सांगितले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण विनंती केल्यानुसार मी परिधान केलेला शर्ट काढून ठेवतो.

**सभापती** :धन्यवाद.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य हे प्रगतीशील राज्य आहे. आता महाराष्ट्र राज्य हे घोटाळयाचे राज्य आहे असे या देशामध्ये वातावरण निर्माण झालेले आहे.

यानंतर श्री. बरवड......

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ...

त्यामुळे राज्यामध्ये वेगळे चित्र उभे राहिलेले आहे. हे राज्य आणि शासनकर्ते शासनाचे कागद सुध्दा सुरक्षित ठेऊ शकत नाहीत. या ठिकाणी मिडियामध्ये आणि वृत्तपत्रांमध्ये असे येते की, राज्याचे मंत्रीच कागद चोरत आहेत, कागद फाडत आहेत. त्यामुळे जनतेमध्ये वेगळे वातावरण तयार झालेले आहे. या राज्याचे सनदी अधिकारी, आय.ए.एस. अधिकारी या राज्याचे भूखंड देऊन लयलूट करीत आहेत. त्यादृष्टीकोनातून माझी अशी मागणी आहे की, नियम 289 अन्वये मी जी मागणी केलेली आहे त्याप्रमाणे सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन या ठिकाणी आदर्श घोटाळ्याची चर्चा करावी.

डॉ. नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, कारगील मधील विधवांशी संबंधित हा विषय आहे. गेला महिना दीड महिना संपूर्ण महाराष्ट्र आणि भारत या विषयामुळे हादरुन गेलेला आहे, सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांची विधाने वाचली, ऐकली तर त्यांनी असे म्हटले आहे की, आदर्श घोटाळ्यातील कोणत्याही आरोपीची गय केली जाणार नाही. अधिकाऱ्यांवर सुध्दा वेगवेगळ्या पध्दतीच्या नोटिसेस काढण्यात आलेल्या आहेत. सीआरझेड, पर्यावरण हे सगळे नियम पायदळी तुडविले गेले आहेत. आपण नेहमी म्हणतो की म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावतो. या ठिकाणी गुड गव्हर्नन्स, सुप्रशासन आणि लोकशाही याची सुध्दा म्हातारी मृत्यूमुखी पडलेली आहे आणि काळ पण सोकावलेला आहे. परत परत असेच नियम तोडले जातील. म्हणून या नियम 289 च्या प्रस्तावावर चर्चा घडवून आपण संपूर्ण महाराष्ट्रातील लोकांच्या ज्या भावना आहेत त्यांना योग्य प्रकारे न्याय द्यावा अशी आमची विनंती आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, एका महत्वाच्या विषयाच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि बाकीच्या सर्व सहकाऱ्यांनी चर्चा उपस्थित केली आहे. मला या सभागृहाच्या मार्फत राज्यातील तमाम जनतेला सत्ताधारी पक्षाच्या वतीने असा मेसेज द्यावयाचा आहे की, आमची या चर्चेला तयारी आहे. परंतु मला एवढेच सांगावयाचे आहे की, ही तयारी असताना आज दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर जे काही कामकाज दाखविले आहे ते आपण घ्यावे. खरे तर यासंदर्भात कालच जर हा मुद्दा उपस्थित केला असता तर आजच आपण कामकाज पत्रिकेवर ते कामकाज दाखविले असते आणि

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG

श्री. अजित पवार .....

त्यासंदर्भातील चर्चा केली गेली असती. या मुद्याच्या संदर्भात राज्य सरकारची भूमिका सुध्दा अतिशय स्पष्ट आणि पारदर्शक आहे. अशा प्रकारच्या घटना राज्यामध्ये अजिबात कदापीही होता कामा नये. यामध्ये अधिकारी देखील जर काही चुकीचे करीत असतील तर त्या अधिकाऱ्यांना सुध्दा कडक शासन झाले पाहिजे. कारण अलीकडच्या काळात ज्या ज्या वेळी या राज्यामध्ये आणि देशामध्ये घटना घडलेल्या आहेत, मग घोटाळ्याच्या बाबतीत असतील, चुकीच्या बाबतीत असतील, त्या प्रत्येक वेळी राज्यकर्त्याला किंवा तेथील प्रमुख व्यक्तीला राजीनामा द्यावा लागला. आपल्या राज्यामध्ये सुध्दा ज्यावेळी 26/11 चा हल्ला झाला त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री तसेच देशाचे गृहमंत्री यांनी राजीनामे दिले. याही वेळेला राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी पक्षश्रेष्ठींनी सांगितल्यानंतर राजीनामा दिला. त्यामुळे या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांचे, माझे स्वत:चे आणि आम्हा सगळ्यांचे मत असे आहे की, याबद्दलची चर्चा झाली पाहिजे. या चर्चेच्या निमित्ताने केंद्राने काय सूचना दिलेल्या आहेत, त्यांच्या मार्फत पुढची काय कार्यवाही चालू आहे, राज्य सरकारची याबद्दलची काय भूमिका आहे या सगळ्याचे उत्तर देण्याची राज्य सरकारची तयारी आहे. फक्त माझी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना अशी विनंती आहे की, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर जे कामकाज दाखविले आहे ते संपवावे आणि उद्या ही चर्चा घ्यावी. उद्या या चर्चेसाठी वेळ द्यावा. त्याचे उत्तर देण्यास आमची तयारी आहे.

**सभापती** : आज नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या ज्या तीनही सूचना आहेत त्या पाहिल्या व एकंदरीत आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवरील जे विषय आहेत त्या विषयांच्या दृष्टीने बघितले तर नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या सूचनांमधील कोणताही आशय आजच्या कामकाजामध्ये नाही. या व्यतिरिक्त आजच्या दिवसाच्या कामकाजामध्ये पुरवणी मागण्यांवर चर्चा हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. माझे याबाबतीत एक मत असे आहे की, संसदीय लोकशाहीमध्ये आपण प्रश्नोत्तराचा तास हा अत्यंत महत्वाचा मानतो आणि

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती**.......

सभागृह सुरु झाल्यानंतर प्रश्नोत्तराचा तास पहिला घेतला जातो. त्यानुसार आज आपण प्रश्नोत्तराचा तास पूर्ण करु या. त्यानंतर माननीय विरोधी पक्षाच्या आणि सत्तारुढ पक्षाच्या नेत्यांना मी चर्चेसाठी बोलवीन. त्यावेळी या विषयावरील चर्चा कधी घ्यावयाची ते ठरविण्यात येईल. मी या तिन्ही सूचनांना अनुमती नाकारीत आहे. आता प्रश्नोत्तरे सुरु होतील.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: लेखी उत्तरे

**नवसारी, बिल्लीमोरा, दमण, वापी इत्यादी ठिकाणी वितरित करण्यात आलेल्या दुधाची थकबाकी मिळविण्याबाबत**

**(१) * १०२३७ श्रीमती अलका देसाई , श्री.मोहन जोशी , श्री.संजय दत्त , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप**
**:** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील महानंद डेअरीने गुजरात राज्यातील नवसारी, बिल्लीमोरा, दमण, वापी इत्यादी ठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून वितरित करण्यात आलेल्या दुधाची थकबाकी मिळण्यासाठी वारंवार पाठपुरावा करुनही अद्याप ती मिळाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१० मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुजरात राज्यासाठी वितरित करण्यात आलेल्या दुधाची थकबाकी त्वरित मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मधुकरराव चव्हाण** : (१) सदर बाब दिनांक १/६/२००४ पासून महानंदच्या निदर्शनास आलेली आहे.

(२) वितरकांकडील येणे असलेल्या रकमांच्या वसुलीबाबत महानंदमार्फत न्यायालयात दावे दाखल करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, वितरकांना वितरित करण्यात आलेल्या दुधाच्या रकमेची वसुली करण्याबाबत महानंदमार्फत न्यायालयात केव्हा दावे दाखल करण्यात आले ?

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

श्री.मधुकरराव चव्हाण : सभापती महोदय,....

( सभागृहात घोषणा सुरुच असतात. )

**सभापती** : सभागृहामध्ये कामकाज करण्यासारखी परिस्थिती नसल्यामुळे सभागृहाची बैठक मी दुपारी 2 वाजेपर्यंत तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.27 ते 2.00 पर्यंत स्थगित झाली.)

------

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ D/ KTG/ ST/ 14:00

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वये "आदर्श घोटाळया"संबंधी प्रस्ताव दिलेला आहे. या प्रस्तावानुसार आजचे सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला सारुन याविषयावर चर्चा घ्यावी अशी आम्ही मागणी केलेली आहे. सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या विषयावर चर्चा घेण्याची तयारी दर्शविलेली आहे. परंतु ही चर्चा आता घ्यावी अशी आमची मागणी आहे. म्हणून आजचे सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला सारुन चर्चेला सुरुवात करावी अशी मी पुनश्च मागणी करीत आहे. सभागृहाच्या नेत्यांनी चर्चेची तयारी दर्शविली असली तरी ती चर्चा ते कधी घेणार हे माहीत नाही. ही चर्चा आज घेण्याऐवजी ती पुढे ढकलण्याची जी भूमिका राज्य सरकारने घेतलेली आहे ती आम्हाला मान्य नाही. तेव्हा आदर्श घोटाळ्यासंबंधी ताबडतोबीने चर्चा सुरु करावी अशी आमची मागणी आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जोरजोराने घोषणा देऊ लागतात.)

श्री. अजित पवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते आणि अन्य सर्व सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आमची आज देखील चर्चा करण्याची तयारी आहे. आज पुरवणी मागण्यावर चर्चा आहे. त्यामुळे त्या मागण्यांवरील चर्चा आपणाला करावी लागेल. त्यानंतर उद्या पुरवणी विनियोजन विधेयक घेण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना संसदीय कामकाज कसे चालते याची माहिती आहे. सभापती महोदय, आजचे कामकाजपत्रिकेवरील महत्वाचे कामकाज पूर्ण करुन माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे आपण चर्चा घेऊ....(अडथळा).. आम्हाला अधिवेशन अजिबात गुंडाळायचे नाही. पुरवणी मागण्या मंजूर करुन लगेच आपण चर्चेला सुरुवात करु.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वये आदर्श घोटाळयासंबंधी सूचना दिलेली अहे. आदर्श घोटाळयाप्रकरणी काँग्रेसच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांनी आदेश दिल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला. आदर्श घोटाळयात अडकलेल्या मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला, सर्व सरकार बदलले, दिल्ली हादरली,गल्लीपासून दिल्लीपर्यन्त काँग्रेस बदनाम झाली. असे असताना या पेक्षा तातडीचा दुसरा कोणता विषय असू शकतो ? एका बाजूला या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

आदर्श घोटाळ्याची सीबीआय मार्फत चौकशी चालू असताना दुस-या बाजूला या घोटाळयाची कागदपत्रे गायब होत आहेत. या घोटाळयाशी संबंधित असलेले तीन-तीन तत्कालीन मुख्यमंत्री आज मंत्रिमंडळामध्ये आहेत. असे असताना आम्ही सदनामध्ये कसे काय कामकाज करायचे ? म्हणून या आदर्श घोटाळयाप्रकरणी प्रथम तत्कालीन संबंधित मुख्यमंत्री आणि संबंधित सनदी अधिकारी यांचे राजीनामे घेणे आवश्यक आहे. म्हणून या गंभीर विषयावर सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला ठेवून नियम 289खाली चर्चा करावी अशी आमची मागणी आहे.

...नंतर श्री. भोगले....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की, याठिकाणी सभागृहाचे नेते आणि माननीय उपमुख्यमंत्री यांनी आदर्श प्रकरणाचा उल्लेख होताच सांगितले आहे की, या विषयावर चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे. सभागृहाच्या नियमित कामकाजातील पुरवणी मागण्या आज मंजूर होणे अत्यावश्यक आहे. त्यानंतर आदर्श प्रकरणासंबंधी निश्चितपणे चर्चा करता येईल. मी आता सभागृहाचे पुढील कामकाज पुकारीत आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 1997-98 या वर्षाचा पंधरावा वार्षिक अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

(सभागृहात दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

-----

एच.2ए

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

(पुढे सुरु.......

श्री.भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सन 2010 च्या दुस-या (पावसाळी)अधिवेशनात दिनांक 12 जुलै, 2010 ते 27 जुलै, 2010 या कालावधीत मा.मंत्री/ राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 357 आश्वासनांची यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : सन 2010 च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासनांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या आश्वासनांची यादी कृपया छापावी.)

-----

एच.2बी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

(पुढे सुरु......

श्री.भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 1982 च्या पहिल्या अधिवेशनापासून ते सन 2010 च्या दुस-या अधिवेशनापर्यंत देण्यात आलेल्या 673 आश्वासनांवरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : आश्वासनांवरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(सभागृहात दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

-----

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन 2003-2004 या वर्षाचा वार्षिक अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

(सभागृहात दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

-----

..3..



(सभागृहात दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा दिनांक 1 जुलै, 2008 ते 30 जून, 2009 या कालावधीचा वार्षिक अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

(सभागृहात दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

-----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**उप सभापती** : सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर यांनी "वाशिम जिल्हयातील मालेगाव पंचायत समितीअंतर्ग पिंपळा येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत कुमारी मंजिरी बंडू डहाळे या शिक्षिकेची सन 2006 मध्ये नियुक्ती करण्यात येणे, फेब्रुवारी, 2010 मध्ये श्री.दिलीप जाधव यांचेकडून वारंवार पैशांची मागणी करुन लैंगिक छळ केल्याबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(सभागृहात दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "पंतप्रधान सडक योजनेद्वारे बांधा, वापरा व हस्तांतरित करा या योजनेंतर्गत रस्ता चौपदरीकरणाची कामे सुरु असणे, परंतु बुलढाणा जिल्हयातील खामगांव-चिखली-बोराळा व बोराळा-अमडापूर-चिखली या राज्य महामार्गाच्या चौपदीकरणाच्या कामात अनेक गैरप्रकार सुरु असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये उभे राहून घोषणा देत असतात)

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, संजय केळकर, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील यांनी "राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील पूर्ण वेळ निदेशक पदनामात बदल करुन पूर्ण वेळ शिक्षक पदनाम करणे व इतर मागण्यांसंदर्भात मा.मंत्री महोदयांकडे दिनांक 9.9.2010 रोजी बैठकीत पूर्ण वेळ निदेशक हे पदनाम बदलून पूर्ण वेळ शिक्षक हे पदनाम देण्याबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(सभागृहात दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**.............

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रोहित जगजितसिंह राठोड विरुध्दच्या खटल्यामध्ये मागासवर्गीयांच्या दाखल्याची जात पडताळणी करण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेली समिती बेकायदेशीर ठरवून अतिरिक्त आयुक्त, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या शासनाने गठीत कराव्यात असे दिलेले आदेश" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये उभे राहून घोषणा देत असतात)

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "कोकणामध्ये खनिजांच्या खाणीबरोबरच कोळशावरील वीज निर्मिती प्रकल्प असून आता जैतापूर अणूऊर्जा प्रकल्प होत असून या सर्व गोष्टींचा कोकणातील पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा सर्वंकष अभ्यास न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये उभे राहून घोषणा देत असतात)

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "रायगड जिल्हयातील उसर (ता.अलिबाग) येथे गेल इंडिया कंपनी कार्यरत असून या व्यवस्थापनामध्ये रायगड श्रमिक संघटना काम करीत असणे, 93 कामगारांपैकी 26 कामगारांना कामावरुंन कमी केल्याबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(सभागृहात दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी "दिनांक 5.12.2010 रोजी नागपूर येथील गणेशपेठ मधील मॉडेल मिलजवळील कर्नल बाग चौकात शिवाजी महाराजांच्या पुतळयाजवळील माओवाद्यांचे धमकीयुक्त पत्रक आढळून आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..6..



**उप सभापती**.............

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "नागपूर येथील हजारी पहाड भागात खडगी कुटुंबाच्या मालकीच्या शेतजमिनीवर 32 सदनिकांची गृहनिर्माण संस्था सुरु करताना झालेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(सभागृहात दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

सभागृहातील परिस्थिती विचारात घेता मला पुढील कामकाज करणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 2.20 पर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.08 ते 2.20 पर्यंत स्थगित झाली.)

------

नंतर आय.1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. केशवराव मानकर)**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक पुन्हा 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.20 ते 2.30 पर्यंत स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी मा.उपसभापती )**

( विरोधीपक्षाचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून आदर्श घोटाळयावर नियम 289 अन्वये चर्चा घ्यावी या मताचे होतो. आदर्श घोटाळ्यामुळे महाराष्ट्र बदनाम झालेला आहे. खरे म्हणजे अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासन आदर्श घोटाळ्यावरील चर्चा उपस्थित करणार होतो परंतु शेतक-यांचे आणि जनतेचे महत्वाचे प्रश्न होते त्यामुळे आदर्श घोटाळयाचा विषय आम्ही सुरुवातीला उपस्थित केला नाही. त्यामुळे आता आम्ही आदर्श घोटाळयावरील चर्चा नियम 289 अन्वये उपस्थित केलेली आहे. महाराष्ट्रात सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे केले जात असतांना ख-या अर्थाने महाराष्ट्राला सुवर्ण महोत्सवी वर्षात बदनाम करण्यात आलेले आहे. प्रश्नोत्तराच्या तासाचे तसेच पुरवणी मागण्यांना एक वेगळे महत्व आहे याची आम्हाला जाणीव आहे. या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय श्री. दिवाकर रावते यांनी आदर्श घोटाळयाच्या संदर्भात जे काही मत व्यक्त केलेले आहे ते अगदी योग्य आहे. त्यांनी म्हटल्या प्रमाणे आदर्श घोटाळा हे एक हिमनगाचे टोक आहे. आदर्श् घोटाळयाच्या संदर्भात मी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागवली होती त्यामध्ये असे दिसून आले की, प्रत्येक दिवशी आदर्श घोटाळयाच्या फाईलमध्ये वेगवेगळया सहया होत होत्या. या आदर्श घोटाळयात कोण दोषी आहे, कोण नाही याची चौकशी होईल तेव्हा होईल परंतु या आदर्श घोटाळयाची वस्तुस्थिती काय आहे त्याची संपूर्ण माहिती सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. आदर्श घोटाळयामुळे मुख्यमंत्री महोदयांना पद सोडावे लागले व माननीय अजित पवार यांना उपमुख्यमंत्री पदाची संधी मिळाली. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्यावेळेस पदाच्या संदर्भात तत्परता दाखवली होती तशीच तत्परता त्यांनी या चर्चेसाठी दाखवण्याची आवश्यकता आहे. त्यावेळी माननीय तटकरे साहेबांच्या बंगल्यावर तातडीची बैठक झाली होती, पत्रही गेले होते असे आम्ही ऐकले होते. यामध्ये खरे काय, खोटे काय हे आम्हाला माहिती नाही. परंतु मा. अजित पवार यांनी त्यावेळेस जी तत्परता दाखवली तशी तत्परता त्यांनी या ठिकाणीही दाखविण्याची आवश्यकता

..2...

श्री. विनोद तावडे....

आहे. या आदर्श घोटाळयामध्ये सनदी अधिकारी, राजकीय नेते किंवा इतर काही लोक दोषी आहेत. त्यामुळे या विषयावरील चर्चा होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे आजच्या दिवसाचे सर्व कामकाज बाजूला सारुन या आदर्श घोटाळयाच्या संदर्भात चर्चा होण्याची आवश्यकता आहे. तडफदार माननीय उपमुख्यमंत्र्यांकडून आदर्श घोटाळयातील भ्रष्टाचार गाडण्याच्या संदर्भात निश्चय व्यक्त होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सभागृहासमोर आज जे काही कामकाज आहे ते बाजूला सारुन आदर्श घोटाळयावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे आदर्श घोटाळयावरील चर्चा तातडीने घ्यावी अशी आम्ही आपल्याला विनंती करतो.

**उप सभापती** : सभागृहापुढील आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून आदर्श घोटाळयावर चर्चा घ्यावयाची आहे काय ?

श्री. विनोद तावडे : होय.

उप सभापती : मला वाटते आजचे कामकाज पहिल्यांदा पूर्ण होण्याची आवश्यकता आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, विरोधी पक्ष घोटाळयाच्या संदर्भातील चर्चेची मागणी करीत आहेत. सत्ताधारी पक्ष सुध्दा या विषयाबाबत चर्चा व्हावी या मताचे आहे. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी या विषयावर आताच चर्चा घेणे योग्य होणार नाही असे सांगितलेले आहे. त्याचे कारण असे आहे की, आदर्श घोटाळयापेक्षा अनेक महत्वाचे विषय सभागृहाच्या समोर चर्चेसाठी आहेत. त्यामुळे दिवसभराचे सर्व कामकाज बाजूला सारुन घोटाळयावर चर्चा करणे योग्य होणार नाही.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

आम्ही दोन दोन महिने अगोदर प्रश्न देत असतो, लक्षवेधी सूचना देत असतो त्यामुळे सभागृहाच्या समोर महत्वाचे जे कामकाज आहे त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

सभागृहासमोर शेतक-यांचे, कामगारांचे प्रश्न आहेत, मुंबईचे प्रश्न आहेत असे असतांना त्यावर चर्चा न करता आताच घोटाळयावरील चर्चेला सुरुवात करा असे म्हणणे योग्य होणार नाही. घोटयावळयावरील चर्चा घेऊ नये असे आमचे मत नाही परंतु आज सभागृहासमोर महत्वाचे विषय असल्यामुळे ....

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

**पृ.शी.**: चंद्रपूर येथील महाऔष्णिक विद्युत केंद्रातील संचाच्या दुरुस्तीमध्ये होत असलेला गैरव्यवहार.

**मु.शी.**: चंद्रपूर येथील महाऔष्णिक विद्युत केंद्रातील संचाच्या दुरुस्तीमध्ये होत असलेल्या गैरव्यवहारासंबंधी श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री. दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, श्री. रामदास कदम, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही. )

------

**पृ.शी.**: डोंबिवली जवळील सोनारपाडा येथे उच्चदाबाची वीजवाहक तार पडून तीन मुलांचा झालेला मृत्यू

**मु.शी.**: डोंबिवली जवळील सोनारपाडा येथे उच्चदाबाची वीजवाहक तार पडून तीन मुलांचा झालेला मृत्यू संबंधी सर्वश्री अरुण गुजराथी, गुरुनाथ कुलकर्णी, हेमंत टकले, सतिश चव्हाण, श्रीमती उषाताई दराडे, श्री. रमेश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही. )

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी.** :राज्यातील गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादी कारवायांमध्ये होत असलेली वाढ

**मु. शी.** : राज्यातील गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादी कारवायांमध्ये होत असलेली वाढ यासंबंधी सर्वश्री किरण पावसकर, रामदास कदम, दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.परशुराम उपरकर, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री संजय केळकर, हेमंत टकले, सतीश चव्हाण, ॲड.उषा दराडे, श्री.विजय सावंत , वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही. )

-----

**पृ.शी.**: मुंबई, उपनगर, ठाणे, पुणे शहर तसेच राज्यातील इतर जिल्ह्यांत बेकायदा मसाज सेंटर्स सुरु असणे

**मु.शी.**: मुंबई, उपनगर, ठाणे, पुणे शहर तसचे राज्यातील इतर जिल्ह्यांत बेकायदा मसाज सेंटर्स सुरु असणे यासंबंधी श्री.मोहन जोशी, श्रीमती दिप्ती चवधरी व श्री.उल्हास पवार, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही. )

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी.** : रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील नवेदर नवगाव येथील खाडीवर ग्रोयन्स पध्दतीचा बंधारा बांधणे

**मु. शी.** : रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील नवेदर नवगाव येथील खाडीवर ग्रोयन्स पध्दतीचा बंधारा बांधणे यासंबंधी सर्वश्री जयंत प्र.पाटील व कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही. )

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**उपसभापती** : आजच्या विशेष उल्लेखाच्या सूचना उद्या, दिनांक 8 डिसेंबर, 2010 रोजी घेण्यात येतील.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.**: सन 2010-2011 च्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

**उपसभापती** : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर चर्चा आज, मंगळवार, दिनांक 7 डिसेंबर, 2010 रोजी घेण्यात येत आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सन्माननीय सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना कृपया बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगावा. ही चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सन्माननीय सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रम पत्रिकेवरील दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

**विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या**

**उपसभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यास येतील :-

(1) मुख्य मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक ए-1, ए-2, ए-4, ए-5, ए-6, ए-7, ए-7-ए, एफ-2, एफ-4, एफ-6-ए, जे-1, जे-4,क्यू-3;

(2) उप मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक जी-1, जी-5, जी-7, के-6, के-11, ओ-1, ओ-5, ओ-8, ओ-9, ओ-11, ओ-15, ओ-16, ओ-17, ओ-18, ओ-19, ओ-20, ओ-21, ओ-22, ओ-23, ओ-24,ओ-25,ओ-26,ओ-27,ओ-28, ओ-29, ओ-30, ओ-31, ओ-32, ओ-33, ओ-34, ओ-35, ओ-36, ओ-37, ओ-38, ओ-39, ओ-40, ओ-41, ओ-42, ओ-43, ओ-44, ओ-45, ओ-46,ओ-47;

(3) उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक बी-7, बी-9, के-5, के-7;

..5.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ....

(4) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमक वगळून) आणि पर्यटन मंत्र्याच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एच-4, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9, झेड-डी-4;

(5) गृह मंत्र्यांच्या विभागाची पूरक मागणी क्रमांक बी-1;

(6) वन, पुनर्वसन व मदत कार्य आणि भूकंप पुनर्वसन मंत्र्याच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक सी-5, सी-7, सी-10;

(7) कृषी व पणन मंत्र्याच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक डी-3, डी-8;

(8) ग्राम विकास मंत्र्याच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एल-2, एल-5;

(9) सहकार आणि संसदीय कार्य मंत्र्याच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक व्ही-1, व्ही-2, व्ही-5 ;

(10) राज्य उत्पादन शुल्क आणि अपारंपारिक ऊर्जा मंत्र्याच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-2, बी-3, बी-4, बी-5, के-6;

(11) महसूल व खान जमीन मंत्र्याच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक सी-1,सी-2, सी-4, आय-3, आय-5;

(12) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्याच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एम-2, एम-3, एम-4-ए;

(13) वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन मंत्र्याच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक डी-3, एस-1, एस-2, एस-4;

(14) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्याच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक आय-3, आय-5.

माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, कृपया त्यांनी आपापल्या जागेवर बसावे.. सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांवर आपले विचार मांडावेत.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

..6..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .......

सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत कोणाही सदस्यास भाग घ्यावयाचा नाही असे दिसते. तेव्हा मी आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या सर्व मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर सभागृहाने विचार केला असे जाहीर करतो.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

अशा गोंधळाच्या परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे कठीण असल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज दिवसाकरिता तहकूब करीत आहे.

आजच्या कामकाजपत्रिकेवरील "राज्यात दरवर्षी दोन लाख बालकांचा कुपोषण व तत्सम आजाराने होत असलेला मृत्यू" या विषयावरील नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चा उद्या सकाळी 10.00 वाजता घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 8 डिसेंबर 2010 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 36 मिनिटांनी बुधवार, दिनांक 8 डिसेंबर, 2010 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही